नि.क्र.६१ नि.दि.दावा नं. ५९/२०१७
धोंडू वि. परशुराम

**पडताळणी**

**मी देवाशपथ खरे सांगतो की, माझे नाव विष्णु गोविंद भोईर आहे. माझे पुराव्याच्या शपथपत्रातील संपुर्ण मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे.**

**उलटतपासणी प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एम. वाय. घायले यांचेमार्फत सुरू.**

०१. मी, वादी तसेच प्रतिवादी सर्व एकाच गावात राहतो. हे म्हणणे खरे आहे की, ज्याच्या घरासमोर मोकळी जागा असते त्या मोकळया जागेचा वापर तो घरमालक करतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीच्या घराच्या पुढे व मागे दोन्ही बाजूला मोकळी जागा आहे व तो त्या दोन्ही ठिकाणी असलेल्या मोकळया जागेचा वापर करतो. हे म्हणणे खरे आहे की, मोरेश्वर लक्ष्मण भोईर, जयराम काशिनाथ भोईर, सहदेव लक्ष्मण भोईर व गोविंद सखाराम भोईर यांच्या घराच्या समोर व मागे देखील मोकळी जागा आहे व ते सर्वजण त्या पुढे मागे असलेल्या मोकळया जागेचा वापर करतात. हे म्हणणे खरे आहे की, तशा वापराबाबत प्रतिवादी किंवा मोरेश्वर लक्ष्मण भोईर, जयराम काशिनाथ भोईर, सहदेव लक्ष्मण भोईर व गोविंद सखाराम भोईर यांनी एकमेकांविरुध्द हरकत घेतली नाही.

०२. हे म्हणणे खरे आहे की, वादी व माझे प्रस्तुत दाव्यासंबंधी बोलणे होते. हे म्हणणे खरे नाही की, वादी माझे चुलते असल्यामुळे त्यांच्या बाजुने मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी बांधकाम करत असल्यामुळे आम्ही हरकत घेतल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वादीच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2025.11.17 14:45:52 +0530

स्थळ : रोहा. (एस. व्ही. खैरे)
दि. १९.११.२०२५ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), रोहा.